दहशतवादग्रस्त व दंगलग्रस्त आपद्ग्रस्तांना
मदत देऊन त्यांचे पुनर्वसन करणे.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
शासन निर्णय-क्र.आरएलएफ-११-०३/प्र.क्र.३१० /म-३
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २४ ऑगस्ट, २००४.

**प्रस्तावना :**

सध्या केवळ देशातच नव्हे तर पूर्ण जगात, आर्थिक, सामाजिक असंतुलन निर्माण झाले आहे. त्यातच धार्मिक, वांशिक, पंथीय, प्रांतिक इ. वादांची भर पडली आहे. तसेच सध्याची जीवनशैली ही संघर्षपूर्ण, धकाधकीची झाली आहे. राज्यास दंगल-लुटालूट-दहशतवादी कारवाया इत्यादींची पार्श्वभूमी नसली तरीही काही वेळा अशा प्रसंगाना सामोरे जावे लागते. त्या घटनांचे निराकरण करणे, त्या आटोक्यात आणणे यासाठी शासन सदैवच सतर्क असते. तथापि, अशा प्रसंगामध्ये ज्या सर्वसामान्य, निरपराध व्यक्तींची जी हानी - आर्थिक, भौतिक, मानसिक, सामाजिक इत्यादी - होते ती भरुन काढणे तर एक अशक्यप्राय गोष्ट आहे. मात्र या धक्क्यातून सावरण्यासाठी त्यास जे सहाय्य, जो आधार आवश्यक असतो तो देणे शासनाचे कर्तव्यच ठरते.

२. दंगल / दहशतवाद या मानवनिर्मित आपत्तीमुळे बाधित झालेल्या आपद्ग्रस्तांना माणुसकीच्या दृष्टीकोनातून तातडीने मदत देणे आवश्यक आहे. तथापि, त्याबाबत शासनाचे कायमस्वरुपी धोरण नसल्यामुळे अशा आपद्ग्रस्तांना तातडीने मदत देण्यामध्ये अडचणी उपस्थित होतात, व "विशेष बाब" म्हणून मदत द्यावयाची ठरल्यास त्यास विलंब होतो. ऑगस्ट, २००३ मध्ये मुंबई शहरात झालेल्या शक्तिशाली बॉम्बस्फोटाच्या दहशतवादी घटनेनंतर आपद्ग्रस्तांना मदत देण्याकरिता नेमण्यात आलेल्या समितीने अशा घटनांनी बाधित व्यक्तिंचे पुनर्वसन करण्याबाबत व्यापक धोरण स्विकारण्याची शिफारस शासनास केली होती. प्रस्तुत शिफारस व सर्व अडचणींचा साकल्याने विचार करुन दंगल / दहशतवादी कारवायातील आपद्ग्रस्तांना मदत देण्याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय**

दंगल, दहशवादी कारवाया यामुळे बाधित झालेल्या व्यक्तिंना / त्यांचे वारसांना खालील विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे मदत देण्यात यावी.

| अ.क्र | वर्गवारी | (रुपये) अनुदान | कर्ज | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | मृत व्यक्तिंच्या वारसास | | | |
| | अ) वयोमर्यादा १८ ते ६५ वर्षे | १,००,०००/- प्रति व्यक्ती | -- | १,००,०००/-प्रति व्यक्ती |
| | ब) वयोमर्यादा ८ ते १८ वर्षे | ५०,०००/- प्रति व्यक्ती | -- | ५०,०००/- प्रति व्यक्ती |
| | क) वयोमर्यादा ८ वर्षाखालील | २५,०००/- प्रति व्यक्ती | -- | २५,०००/- प्रति व्यक्ती |
| २ | कायम अपंगत्व | ५०,०००/-प्रति व्यक्ती | -- | ५०,०००/- प्रति व्यक्ती |
| ३ | तात्पुरते अपंगत्व | १०,०००/-प्रति व्यक्ती | -- | १०,०००/- प्रति व्यक्ती |
| ४ | जखमी -आठवडयापेक्षा जास्त कालावधी रुग्णालयात दाखल झालेल्या व्यक्तिंसाठी | ५,०००/- प्रति व्यक्ती | -- | ५,०००/- प्रति व्यक्ती |
| ५ | झोपडी पुनर्बांधणी | ७,५००/-पर्यंत | -- | ७,५००/-पर्यंत |
| ६ | पक्क्या घरांची दुरुस्ती | ७,५००/- | १०,०००/- | १७,५००/-पर्यंत |
| ७ | स्टॉल्स् व दुकाने | १०,०००/-पर्यंत | १०,०००/- | २०,०००/- पर्यंत |
| ८ | टप-या | ५,०००/-पर्यंत | -- | ५,०००/-पर्यंत |
| ९ | हातगाडया | ४,०००/-पर्यंत | -- | ४,०००/-पर्यंत |
| १० | पुर्ण जळालेली किंवा संपूर्ण निकामी टॅक्सी | २५,०००/-पर्यंत | -- | २५,०००/-पर्यंत |
| ११ | पुर्ण जळालेली किंवा संपूर्ण निकामी रिक्षा | १३,०००/-पर्यंत | -- | १३,०००/-पर्यंत |
| १२ | सायकल | १,०००/- पर्यंत | -- | १,०००/-पर्यंत |
| १३ | मोटार सायकल, दुचाकी यंत्रचलित वाहने | ५,०००/-पर्यंत | -- | ५,०००/-पर्यंत |
| १४ | चारचाकी यंत्रचलित वाहने | २५,०००/-पर्यंत | -- | २५,०००/-पर्यंत |
| १५ | अंशतः जळालेली / नुकसान झालेली चार चाकी वाहने | ५०००/-पर्यंत | -- | ५०००/-पर्यंत |
| १६ | अंशतः जळालेल्या/नुकसान झालेल्या रिक्षा | २५००/-पर्यंत | -- | २५००/-पर्यंत |

(कृ.मा.प.

सदर मदत वाटप करतांना विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे किंवा झालेल्या नुकसानीच्या ५० टक्के यापैकी जी रक्कम कमी
असेल त्या रकमे इतक्या मदतीचे वाटप करावे.
नुकसानी संदर्भात जर विमा कंपनीकडून नुकसान भरपाई मिळालेली असेल तर त्या आपद्ग्रस्तास मदत [illegible] येऊ नये.
उपरोक्त विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे मदत वाटप करण्यापूर्वी संबंधित आपद्ग्रस्त व्यक्ति वा संस्था यांचा अशा
घटनान्वये नोंदविण्यात आलेल्या गुन्हयामध्ये किंवा प्रथम खबरी अहवालामध्ये नामोल्लेख नसावा वा त्यांचेवर कोणतेही गुन्हे दाखल
नसावेत याची खातरजमा पोलीस विभागाकडून करुन घेण्यात यावी. तसेच मदत वाटप करण्यापूर्वी नुकसानीसंबंधात [illegible]
विभाग जसे सार्वजनिक बांधकाम विभाग, परिवहन विभाग, स्थानिक प्राधिकरण यांचे अभिप्राय घेण्यात यावेत. सदर मदत वाटप
संबंधित जिल्हाधिकारी, त्यांचे अधिनस्त असलेल्या उपविभागीय अधिकारी / तहसिलदार यांचेमार्फत करतील.
या बाबींवर होणारा खर्च मागणी क्र.सी-५-२२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण -६० - इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण
कार्यक्रम - २०० - इतर कार्यक्रम २०० (०१) (०१) दंगलग्रस्त भागातील झळ पोहचलेल्या व्यक्तिंना सहाय्य (२२३५ ०३४७) या
लेखाशीर्षाखाली दाखविण्यात यावा, व या लेखाशीर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

७. सदर आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारीक संदर्भ प्रकरण क्रमांक ८४०/०४/ व्यय-९, दिनांक
२१.८.२००४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(सुरेश काकाणी)
उप सचिव
महसूल व वन विभाग

प्रति,

विभागीय आयुक्त (सर्व).
जिल्हाधिकारी ( सर्व).
उपविभागीय अधिकारी (सर्व) .
तहसिलदार (सर्व).
जिल्हाकोषाधिकारी (सर्व).
महालेखापाल-१/२ (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र मुंबई/नागपूर (प्रत्येकी ३ प्रती).
महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र मुंबई/नागपूर (प्रत्येकी ३ प्रती).
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई, / निवासी अधिदान व लेखा अधिकारी, बांद्रे, मुंबई.
संचालक, लेखा व कोषागारे, संगणक शाखा, मुंबई / वित्त विभाग (व्यय ९), मंत्रालय, मुंबई.
महसूल व वन विभागातील सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव / कार्यासन अधिकारी.
मंत्रालय,मुंबई-४०००३२,
म-३ कार्यासन (निवड नस्ती), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत माहितीसाठी सादर / अग्रेषित -

मा. मुख्य सचिव.
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव.
मा. मुख्यमंत्र्यांचे उप सचिव.
मा. मंत्री (पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव.
मा. राज्यमंत्री (पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव.
मा.सचिव(म.वपु.)यांचे स्वीय सहाय्यक.

*****